महाराष्ट्र शासन

क्रमांक : बैठक १११३/ प्र.क्र.१०१/र-१
महसूल व वन विभाग
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक:- ८ ऑगस्ट,२०१३

विषय :- महाराष्ट्र राज्य पुनर्वसन प्राधिकरणाच्या १५ व्या बैठकीचे इतिवृत्त.

महाराष्ट्र राज्य पुनर्वसन प्राधिकरणाची १५ वी बैठक मा. मंत्री ( मदत व पुनर्वसन ) तसेच अध्यक्ष महाराष्ट्र राज्य पुनर्वसन प्राधिकरण यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या मंत्रालयातील समितीकक्षात दिनांक १९/६/२०१३ रोजी दुपारी ३ वा. पार पडली. सदर बैठकीचे इतिवृत्त सोबत माहिती व उचित कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे.

(च.गु. गोवेकर )
कक्ष अधिकारी

प्रति,
मा. मंत्री ( महसूल ), मंत्रालय, मुंबई-३२
मा. मंत्री ( जलसंपदा ), ( म.कृ.खोरे वि.म.व वगळून ) मंत्रालय, मुंबई-३२
मा. मंत्री ( जलसंपदा ), (म.कृ.वि. महामंडळ ) मंत्रालय, मुंबई-३२
मा. मंत्री ( उद्योग ), मंत्रालय, मुंबई-३२
मा. मंत्री ( उर्जा ), मंत्रालय, मुंबई -३२
मा. मंत्री ( वने ), मंत्रालय, मुंबई-३२
मा. मंत्री ( कृषि ), मंत्रालय, मुंबई -३२
मा. मंत्री सार्वजनिक बांधकाम ( सार्वजनिक उपक्रम ),मंत्रालय, मुंबई-३२
मा. मंत्री ( ग्राम विकास ), मंत्रालय, मुंबई-३२
मा. मंत्री ( पुनर्वसन ), मंत्रालय, मुंबई -३२
मा. राज्यमंत्री (मदत व पुनर्वसन ), मंत्रालय, मुंबई-३२
मा. राज्यमंत्री ( वित्त व नियोजन, उर्जा, जलसंपदा, संसदीय कार्य, उत्पादन शुल्क ),मंत्रालय, मुंबई-३२
मा. राज्यमंत्री ( मदत व पुनर्वसन ), मंत्रालय, मुंबई-३२

## बैठकीचे इतिवृत्त

महाराष्ट्र राज्य पुनर्वसन प्राधिकरणाची १५ वी बैठक मा. मंत्री ( मदत व पुनर्वसन ) व अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य पुनर्वसन प्राधिकरण यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या मंत्रालयीन समिती कक्षात दिनांक १९/६/२०१३ रोजी दुपारी ३ वा. पार पडली बैठकीला खालीलप्रमाणे मान्यवर व अधिकारी उपस्थित होते.

१) मा. श्री.पतंगराव कदम, मंत्री ( म.व पु.) २) मा. श्री.बाळासाहेब थोरात,मंत्री महसूल
३) मा. श्री.शशिकांत शिंदे,मंत्री (जलसंपदा ) ४) मा.श्री. चंद्रकांत बावनकुळे,वि.स.स.
५) मा.श्री.गोपालदास अग्रवाल, विधान सभा सदस्य

**प्राधिकरणाचे अशासकीय सदस्य**

१) श्रीमती प्रतिभा शिंदे, हरलाल नार, तळोदा,जि- नंदुरबार
२) श्री.भारत पाटणकर, उपाध्यक्ष राज्य धरणग्रस्त प्रकल्प शेतकरी परिषद कासेगांव, जि. सांगली
३) श्री.अशोक जाधव,मु.पो.कासंभु ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी

**शासकीय अधिकारी**

१) डॉ. पी.एस.मीना, अ. मु स., सा.प्र. वि.,२) श्री.मिलींद म्हैसकर, सचिव, मदत व पुनर्वसन
३) श्री.यु.पी.एस. मदान, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक,एम.ए.डी.सी.मुंबई
४) श्रीमती एन.एन. पाटील, सह सचिव, वित्त वि.,५) श्री.एम.सी.पाटील, सह सचिव, सा.प्र.वि.
६) श्री.आर.बी. घोटे, स.स. तथा मु.अ. जलसंपदा ७) श्री.सदानंद जाधव, सह सचिव, म. व पु.
८) जिल्हाधिकारी, नागपूर ९) जिल्हाधिकारी, भंडारा १०) श्री.पी.सी.झापके, का.स, वि.पा.मंडळ नागपूर ११) श्री.रमेश डबराई, महाव्यवस्थापक, बी.एच.ई.एल (भेल ) मुंबई
१२) श्री.ए.के.वर्मा, वरिष्ठ उप महाव्यवस्थापक, बी.एच.ई.एल. नवी दिल्ली
१३) श्री.जे.एम.गणवीर,उप महाव्यवस्थापक, बी.एच.ई.एल.(भेल ) नागपूर
१४) श्री.डी.एस.चिलमुलवार, उप आयुक्त ( पुनर्वसन), नागपूर
१५) श्री.ए.पी.पराते, का.अ. अकोला.१६) श्री.नंदकिशोर देवल,विमानतळ संचालक,बिरसी
१७) श्री.आर.के.दुबे जि.पु.अधिकारी, अकोला.१८) श्री.निळकंठ वानिच, उप अभि.अकोला
१९) डॉ. माणिक गुरसळ, अप्पर जिल्हाधिकारी, म.वि.वि. कंपनी, मुंबई-

जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव बैठकीस उपस्थित नसल्याने १) सुरवंडी संग्राहक लघुपाटबंधारे योजना, ता. मालेगांव जि. वाशिम व २) नया अदुरा लघुपाटबंधारे योजना, ता. बाळापूर, जि. अकोला या प्रकल्पाच्या पुनर्वसन योजना प्राधिकरणाने विचारात घेतल्या नाहीत

सदर बैठकीमध्ये खालील प्रकल्पाच्या पुनर्वसन योजना विचारात घेण्यात आल्या.

१) आंतरराष्ट्रीय प्रवासी माल वाहतूक विमानतळ, मिहान प्रकल्प, नागपूर
२) विशेष आर्थिक क्षेत्रातील उद्योग तथा संलग्न सेवा व व्यवसाय ( सेझ ) मिहान अंतर्गत नागपूर
३) बिरसी विमानतळ विस्तारीकरण प्रकल्प, गोंदिया
४) भारत हेवी इले.लि.साकोली जि. भंडारा.

वरील प्रकल्पांच्या पुनर्वसन योजनांवर प्राधिकरणाच्या सदस्यांनी, संबंधित लोक प्रतिनिधींनी सविस्तर चर्चा केली व चर्चेअंती सोबतच्या प्रपत्रा प्रमाणे पुनर्वसन योजना मंजूर करण्यात आल्या.

**शासन पत्र क्रमांक : बैठक ११११/ प्र.क्र.१०९/र-१ दिनांक ८ ऑगस्ट, २०११ चे प्रपत्र**

**महाराष्ट्र पुनर्वसन प्राधिकरणाने मंजूर केलेल्या पुनर्वसन योजना.**

**प्रकल्प** **१) आंतरराष्ट्रीय प्रवासी माल वाहतूक विमानतळ, मिहान प्रकल्प, नागपूर,**
**२) विशेष आर्थिक क्षेत्रातील उद्योग तथा संलग्न सेवा व व्यवसाय**
**( सेझ ) मिहान अंतर्गत नागपूर**

**(अ) नागरी सुविधा :-**

या प्रकल्पामुळे बाधित झालेल्या प्रकल्पग्रस्तांचे खापरी व चिंचभूवन येथे पूनर्वसन करण्यात येत आहे. सदर पुनर्वसित गावठाणात २४ नागरी सुविधा प्रकल्प यंत्रणेकडून पुरविण्यात येणार आहेत.राष्ट्रीय पुनर्वसन धोरण २००७ नुसार उर्वरित दोन नागरी सुविधांची आवश्यकता तपासून गरज असल्यास त्याही नागरी सुविधा देण्यात याव्यात.

**(ब) घरांसाठी भूखंड :-**

शहरी भागातील प्रकल्पग्रस्तांना त्यांच्या सद्याच्या जागेएवढे सर्व सोईने विकसीत भूखंड मोफत देण्यात येईल.३५ चौ.मी. पेक्षा कमी भूखंडधारकांना किमान ३५ चौ.मी. भूखंड मोफत देण्यात येईल. ग्रामीण भागातील प्रकल्पग्रस्त शेतकरी कुटुंबाला सर्व सोईने विकसीत ३०० चौ.मी. इतक्या क्षेत्राचा भूखंड व बिगर शेतकरी प्रकल्पग्रस्तांना १५० चौ.मी. इतक्या क्षेत्राचा भूखंड मोफत देण्यात येईल. सदर भूखंड नोंदणीसाठी स्टँपड्युटी व इतर फी प्रकल्पसंस्था भरेल सदर भूखंड पती पत्नीच्या नावे संयुक्तपणे देण्यात येईल.

**(क) घर बांधणी अनुदान :-**

ग्रामीण भागातील प्रकल्पासाठी ६८० घरे बांधण्यात आलेल आहेत. उर्वरित प्रकल्पग्रस्ताना रुपये १ लक्ष इतके घर बांधणी अनुदान देण्यात येईल.

**(ड) पुनर्वसित गावठाणात सामान हलविण्यासाठी अर्थसहाय्य :-**

पुर्नवसित गावठाणात सामान हलविण्यासाठी रुपये १०,०००/- इतके अर्थसहाय्य प्रत्येक प्रकल्प कुटुंबाला देण्यात येईल.

**(इ) गुरांच्या गोठ्यासाठी अर्थसहाय्य :-**

जमीन व घर संपादित करतांना किमान दोन किंवा जास्त जनावरे बाळगणाऱ्या प्रकल्पग्रस्त कुटुंबाला पुनर्वसित गावठाणात गोठा बांधण्यासाठी रुपये १५,०००/- इतके अर्थसहाय्य दिले जाईल.

**(प) दुकाने / शेड बांधण्यासाठी अर्थ सहाय्य :-**

प्रकल्पग्रस्त कुटुंबापैकी ग्रामीण कारागीर / छोटे व्यापारी / स्वताचा व्यवसाय करणारी जी कुटुंबे आहेत त्यांना पुनर्वसित गावठाणात दुकाने / शेड बांधण्यासाठी एक रकमी रुपये २५,०००/- देण्यात येतील.

**(फ) एक वेळचे अर्थसहाय्य :-**

ज्या कुटुंबांची सर्व जमीनी बाधित क्षेत्रात गेली आहे त्यांना ७५० दिवस किमान कृषि मजुरी दिली जाईल.

ज्या कुटुंबाची जमीन अंशतः बाधित झालेली आहे व त्यामुळे ते कुटुंब अत्यल्प भूधारक झाले आहे त्यास ५०० दिवसांएवढी किमान कृषी मजूरी दिली जाईल.

अल्प भूधारक कुटुंबास ३७५ दिवसाएवढी किमान कृषी मजूरी दिली जाईल.

शेतमजूर कुटुंब तसेच इतर क्षेत्रातील मजूर कुटुंबांना ६२५ दिवसाएवढी किमान कृषी मजूरी दिली जाईल.

**(ब) उदरनिर्वाह भत्ता :-**

प्रकल्पग्रस्त कुटुंबास उदरनिर्वाह भत्ता म्हणून किमान २५ दिवसा एवढी कृषि मजूरी दरमहा एक वर्षाकरीता देण्यात येईल.

**(भ) नोकरी किंवा नोकरी ऐवजी एकमुस्त रक्कम :-**

प्रत्येक प्रकल्पग्रस्त कुटुंबातील एका व्यक्तीची वयोमर्यादा व पात्रता विचारात घेऊन पदांच्या उपलब्धतेनुसार नोकरी देण्यात येईल. नोकरी देणे शक्य न झाल्यास किंवा प्रकल्पग्रस्तांनी स्वतःहून नोकरी नाकारल्यास नोकरी ऐवजी प्रती कुटुंब रुपये २ लक्ष प्रकल्पयंत्रणा देईल.

**(म) नोकरीसाठी तांत्रीक व व्यावसायीक प्रशिक्षण व विद्या वेतन :-**

कंपनीमध्ये नोकरीसाठी आवश्यक ते तांत्रीक व व्यावसायीक प्रशिक्षण प्रकल्पयंत्रणा देईल व प्रशिक्षणार्थींना शैक्षणिक काळात रुपये २००० प्रतीमहा विद्या वेतन देण्यात येईल.

**(य) प्रकल्पाच्या ठिकाणी कंत्राटी कामे :-**

बाधित व्यक्ती / त्यांचा समुह किंवा सहकारी संस्थांना प्रकल्पाच्या ठिकाणी कंत्राटी कामे, दुकाने किंवा आर्थिक उत्पन्नाची साधने प्राधान्याने उपलब्ध करुन द्यावीत.

**(र) प्रकल्पाच्या बांधकामावर मजुर म्हणुन नेमणुक :-**

भूमीहीन शेतमजुरांना आणि बेरोजगार प्रकल्पग्रस्तांना प्रकल्पाच्या बांधकामावर मजूर म्हणून घेण्यास प्राधान्य द्यावे.

**(ल) १२.५० टक्के विकसीत जमीन अथवा समकक्ष सानुग्रह अनुदान :-**

शा. नि. सामान्य प्रशासन विभाग दिनांक ८/१०/२०११ नुसार १२.५० टक्के विकसीत जमीन अथवा समकक्ष सानुग्रह अनुदान प्रकल्प यंत्रणेमार्फत देण्यात यावे.

**(व) अनुसुचित जमातीच्या कुटुंबाना अर्थ सहाय्य :-**

अनुसुचित जमातीच्या कुटुंबाना ५०० दिवस एवढे किमान कृषी मजूरी इतके अधितिरिक्त एकवेळ अर्थसहाय्य देण्यात येईल.

## ३) बिरसी विमानतळ विकास /विस्तारीकरण प्रकल्प,गोंदिया

**या प्रकल्पाची महाराष्ट्र पुनर्वसन प्राधिकरणाने मंजूर केलेली पुनर्वसन योजना.**

**अ) नागरी सुविधा :-**

अ) राष्ट्रीय पुनर्वसन धोरण २००७ नुसार देय २३ नागरी सुविधा पुनर्वसित गावठाणात देण्याचे प्रकल्प यंत्रणेने मान्य केलेले आहे. गावतळे, सिंचन व्यवस्था व चारा निर्मितीकरीता जागा या सुविधा पुनर्वसीत गावठाणात देण्याची आवश्यकता नाही. मात्र संपूर्ण पुनर्वसित वसाहतीमधील अंतर्गत रस्ते, डांबरीकरण केलेली व उघडी गटारे पक्की बांधण्यात यावीत.

ब) खालील तीन रस्ते बंद करण्यापूर्वी वाहन वाहतूकीसाठी पर्यायी मार्ग सुस्थितीत करण्यात यावे, आणि एक वर्षात नवीन प्रस्तावित रस्त्याला लागणारी जागा उपलब्ध करुन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या MDR/SH च्या नॉमर्स प्रमाणे ह्या रस्त्याचे मजबूतीकरण डांबरीकरण करुन देण्यात यावे.

१) खातीया बिरसी कामठा रोड (SH)

२) खातीया शिवमंदिरला जाणारा रस्ता (MDR)

३) कामठा परसवाडा रस्ता (MDR)

**ब) घरासाठी भूखंड व घरे बांधण्यासाठी अनुदान :-**

१) १०० चौ.मी. बांधकाम बाधित होत असल्यास २०५ चौ.मी.चा भूखंड व रु.५ लक्ष

२) १०० चौ.मी. पेक्षा जास्त बांधकाम असल्यास १०० मीटर पेक्षा जास्त क्षेत्रफळाकरीता प्रती चौ.मी. साठी रु. ५०००/-

३) ~~१०००~~ १५० चौ.मी. पेक्षा अधिक बांधकाम असल्यास ४०० चौ.मी. भूखंड या व रुपये ७.५ लक्ष अधिक १५० चौ.मी. पेक्षा जास्त क्षेत्रफळा करीता प्रती चौ.मीटर करीता रुपये ५००० (रुपये १० लक्ष पर्यंत मर्यादेत)

४) एएआय ने शासनाकडून घेतलेल्या जागेवर सध्या असलेल्या बांगला देश निर्वासित प्रत्येक कुटुंबाला १०० चौ.मी. पर्यंत बांधकाम बाधित होत असल्यास २५० चौ.मी. चा भूखंडावर बांधकाम करण्यासाठी रु.५ लक्ष द्यावे लागतील.

५) भूखंडाच्या नोंदणीसाठी स्टॅंपड्युटी व अन्य फी प्रकल्पयंत्रणा देईल व भूखंड पती पत्नीच्या सयुक्त नावे देण्यात येईल.

६) लाभार्थीला आपल्या जुन्या घराचे साहित्य वापरुन बांधकाम करण्याची मुभा राहील.

७) घर बांधणी अनुदान रुपये १ लक्षचा पहिला हप्ता देण्यात येईल. उर्वरित रक्कम प्रत्यक्ष बांधकामाच्या प्रगतीनुसार अदा करण्यात येईल. ही अट सर्व श्रेणीतील घरांना लागू राहील.

**क) पुनर्वसित गावठाणात सामान हलविण्यासाठी अर्थसहाय्य :-**

गावठाणातून सामान हलविण्यासाठी रुपये १०,०००/- हजार इतके अर्थ सहाय्य देण्यात येईल.

**ड) गुरांच्या गोठयासाठी अर्थसहाय्य :-**

जमीन व घर संपादित करताना किमान दोन किंवा जास्त जनावरे बाळगणा-या प्रकल्पग्रस्त कुटुंबाला पुनर्वसित गावठाणात गोठा बांधण्यासाठी रुपये १५,०००/- इतके अर्थसहाय्य दिले जाईल.

**इ)दुकाने/शेड बांधण्यासाठी अर्थ सहाय्य :-**

प्रकल्पग्रस्त कुटुंबापैकी ग्रामीण कारागीर /छोटे व्यापारी / स्वताचा व्यवसाय करणारी जी कुटुंबे आहेत त्यांना पुनर्वसित गावठाणात दुकाने /शेड बांधण्यासाठी एक रक्कमी रुपये २५,०००/- देण्यात येतील.

**प) नोकरी व शेत जमीनी ऐवजी एक वेळचे अर्थसहाय्य :-**

१) प्रकल्पबाधीतांची एक एकर (०.४ हे) किंवा त्यापेक्षा जास्त जमीन बाधीत झाली असल्यास व प्रकल्पग्रस्त धारण करीत असलेल्या एकूण जागेपैकी ७५ किंवा जास्त टक्के जमीन बाधीत झाली असल्यास रुपये ५ लक्ष इतके अर्थसहाय्य देण्यात येईल.

२) प्रकल्पबाधीतांचे एक एकर पेक्षा कमी जमीन बाधित झाली असल्यास व प्रकल्पग्रस्त भूमीहीन होत असल्यास रुपये २.५० लक्ष अर्थसहाय्य देण्यात येईल.

३) ज्यांची उपजिविका संपादित केलेल्या जमिनीवर होती अशा शेतक-यांना वरील अटी पैकी अनुदान देय राहील.

फ) नोकरीसाठी प्रशिक्षण व विद्यावेतन :-

तांत्रीक व व्यावसायीक प्रशिक्षण प्रकल्पयंत्रणा देणे व प्रशिक्षणार्थींना शैक्षणिक काळात प्रतीमहा विद्या वेतन देणे बाबत प्रकल्पसंस्था सखोल सर्वेक्षण करुन कार्यवाही करेल.

ब) उदरनिर्वाह भत्ता :-

प्रकल्पग्रस्त कुटुंबातील एका व्यक्तीला उदरनिर्वाह भत्ता म्हणून किमान २५ दिवसा एवढी कृषी मजूरी दरमहा १ वर्षापर्यंत देण्यात येईल.

भ) निराधार किंवा अश्रीत व्यक्तींना निवृत्ती वेतन :-

निराधार किंवा अश्रीत व्यक्तींना किमान रू.५००/- दरमहा आजीवन निवृत्त वेतन देण्यात येईल.

म) अनुसूचीत जमातीच्या कुटुंबांना अर्थ सहाय्य :-

अनुसूचीत जमातीच्या कुटुंबांना ५०० दिवस एवढे किमान कृषी मजूरी इतके अधितिरिक्त एकवेळ अर्थसहाय्य देण्यात येईल.

य) बाधित ग्रामपंचायतीला अनुदान :-

प्रत्येक बाधित गावाच्या (त्या गावात बाधीत क्षेत्र १० हेक्टर पेक्षा जास्त असावा) ग्रामपंचायतीला रूपये ५० लक्ष नागरी सुविधांच्या देखभालीसाठी एक वेळचे अनुदान देण्यात येईल. सदर अनुदानाच्या बांधकामाची प्रशासकीय मान्यता जिल्हाधिकारी देतील. त्याबदल्यात प्रकल्पाच्या क्षेत्रात केवळ बांधकाम केलेल्या इमारतीच्या स्थानिक कर सदर ग्रामपंचायतीला देण्याचे AAI वर बंधनकारक राहील. दिनांक १.४.२०१३ पासून बांधकाम केलेल्या क्षेत्रावर (इमारतीवर) मालमत्ताकर AAI ग्रामपंचायतीला अदा करीत यापूर्वीचे मालमत्ता कर ग्रामपंचायतीने माफ करावे या अटीच्या अधिन राहून हे अनुदान देण्यात येईल.

र) वन हक्क अधिनियम, २००७ नुसार पुनर्वसनाचे फायदे :-

अनुसूचीत जमातीच्या प्रकल्पबाधीत कुटुंबाच्या ताब्यात वन जमीन असल्यास वन हक्क अधिनियम, २००७ नुसार पुनर्वसन योजनेचे फायदे मिळण्यास ते पात्र राहतील.

********

४) मे.भारत हेवी इलेक्ट्रिकल लिमिटेड (BHEL) ता.साकोली जि.भंडारा

या प्रकल्पांची महाराष्ट्र पुनर्वसन प्राधिकरणाने मंजूर केलेली पुनर्वसन योजना.

अ) पुनर्वसित गावठाण व नागरी सुविधा :-

या प्रकल्पामुळे कोणतेही गावठाण बाधीत होत नसल्याने घरासाठी भूखंड व पुनर्वसित गावठात नागरी-सुविधा देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

आ) एक वेळेचे अर्थ सहाय्य :-

१) ज्या कुटुंबाची सर्व जमीन बाधित क्षेत्रात गेली आहे अशा ९३ खातेदारांना प्रती दिवस १४५/- प्रमाणे ७५० दिवस किमान कृषी मजूरी दिली जाईल.

२) ज्या कुटुंबाची जमीन अंशतः बाधित झालेली आहे व त्यामुळे ते कुटुंब अत्यल्प भूधारक झाले आहेत अशा ६१ खातेदारांना प्रती दिवस १४५ प्रमाणे त्यास ५०० दिवसांएवढी किमान कृषी मजूरी दिली जाईल.

३)अल्प भूधारक कुटुंबास ३७५ दिवसाएवढी किमान कृषी मजूरी दिली जाईल.

४) शेतमजूर कुटुंब तसेच इतर क्षेत्रातील मजूर कुटुंबांना ६२५ दिवसाएवढी किमान कृषी मजूरी दिली जाईल.

(इ) उदरनिर्वाह भत्ता :-

प्रकल्पग्रस्त कुटुंबास उदरनिर्वाह भत्ता म्हणून किमान २५ दिवसा एवढी कृषि मजूरी दरमहा एक वर्षाकरीता देण्यात येईल.

(ई) निराधार किंवा अश्रीत व्यक्तींना निवृत्ती वेतन :-

निराधार किंवा अश्रीत व्यक्तींना किमान रुपये ५०० दरमहा आजीवन निवृत्ती वेतन देण्यात येईल.

(उ) शेअर्स किंवा डिबेंचर्स :-

संपादक संस्था कंपनी असल्यास व सदरहू कंपनी असल्यास व सदरहू कंपनी शेअर किंवा डिबेंचर्स इश्यू करीत असतील तर प्रकल्पबाधीत कुटुंबांना मिळालेल्या रकमेपैकी २० टक्के पर्यंत रक्कम पर्यंतचे शेअर्स किंवा डिबेंचर्स घेऊ शकतात.

pradikarn meenites

**(ऊ) नोकरी किंवा नोकरी ऐवजी एकमुस्त रक्कम :-**

प्रत्येक प्रकल्पग्रस्त कुटुंबातील एका व्यक्तीची वयोमर्यादा व पात्रता विचारात घेऊन पदांच्या उपलब्धतेनुसार नोकरी देण्यात येईल. नोकरी देणे शक्य न झाल्यास किंवा प्रकल्पग्रस्तांनी स्वतःहून नोकरी नाकारल्यास नोकरी ऐवजी प्रती कुटुंब रुपये ५ लक्ष अर्थसहाय्य प्रकल्पयंत्रणा देईल.

**(ए)नोकरीसाठी तांत्रीक व व्यावसायीक प्रशिक्षण व विद्या वेतन :**

नोकरीसाठी आवश्यकते तांत्रीक व व्यावसायीक प्रशिक्षण प्रकल्पयंत्रणा देईल व प्रशिक्षणार्थीना प्रशिक्षण काळात रुपये २००० प्रतीमहा विद्या वेतन देण्यात येईल.

**(ऐ) प्रकल्पाच्या ठिकाणी कंत्राटी कामे :-**

बाधित व्यक्ती / त्यांचा समुह किंवा सहकारी संस्थांना प्रकल्पाच्या ठिकाणी कंत्राटी कामे, दुकाने किंवा आर्थिक उत्पन्नाची साधने प्राधान्याने उपलब्ध करुन द्यावीत.

**(ओ) प्रकल्पाच्या बांधकामावर मजूर म्हणून नेमणूक :-**

भूमीहीन शेतमजुरांना आणि बेरोजगार प्रकल्पग्रस्तांना प्रकल्पाच्या बांधकामावर मजूर म्हणून घेण्यास प्राधान्य द्यावे.

******